लोकसत्ता पा. नं. १३

# महापालिकेत केवळ दोन साहाय्यक आयुक्त

## ४० साहाय्यक आयुक्तांची आवश्यकता; प्रभारींकडे पदभार दिल्याने कामावर परिणाम, भ्रष्टाचाराचा आरोप

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** वसई-विरार महापालिकेत ४० साहाय्यक आयुक्तांची गरज असताना केवळ दोन साहाय्यक आयुक्त कार्यरत आहेत. सगळा कारभार प्रभारी साहाय्यक आयुक्तांवर सोपविण्यात आल्यामुळे कामावर परिणाम होत असून प्रभारी अधिकाऱ्यांविरोधात भ्रष्टाचाराच्या अनेक तक्रारी येत आहेत. पालिकेने शासनाकडे तात्काळ १० साहाय्यक आयुक्तांची मागणी करूनही ते मिळालेले नाहीत.

वसई-विरार महापालिकेची निर्मिती ३ जुलै २००९ रोजी झालेली आहे. २०१४ साली महापालिकेसाठी आकृतिबंध जाहीर करण्यात आलेला आहे. या आकृतिबंधानुसार विविध पदांवर करायच्या नियुक्त्यांचे नियमन व सेवांचे वर्गीकरण करण्यासाठी नियम करण्यात आलेले आहेत. मात्र वसई-विरार महापालिकेतील बहुतांश विभागात या नियमांची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही. अद्यापही महापालिकेला अधिकाऱ्यांचा तुटवडा जाणवत आहे. सार्वजनिक बांधकाम, वैद्यकीय विभाग, सार्वजनिक आरोग्य, घनकचरा, आस्थापन आदी अनेक प्रमुख विभागांकडे साहाय्यक आयुक्तच नाहीत. पालिकेचे ९ प्रभाग आहेत. मात्र दोन प्रभाग वगळता सर्व प्रभागांमध्ये प्रभारी साहाय्यक आयुक्तांची नियुक्ती करण्यात आली आहे. अधीक्षकांना बढती देऊन प्रभारी साहाय्यक आयुक्त बनविण्यात आले आहेत.

### गरजेपेक्षा जास्त उपायुक्त

मागील वर्षभरात शासनाने पालिकेला १३ उपायुक्त दिले आहेत, तर केवळ दोन साहाय्यक आयुक्त दिले आहेत. एवढ्या जास्त उपायुक्तांची गरज नसल्याचे आस्थापना विभागाने सांगितले. आम्ही सातत्याने साहाय्यक आयुक्तांची मागणी करत आहोत, परंतु आम्हाला उपायुक्त दिले गेले. यातील २-४ उपायुक्त कमी केले तरी चालतील असे आस्थापना विभागाने सांगितले. साहाय्यक आयुक्त हे वर्ग २ श्रेणीचे पद आहे. मात्र ते नसल्याने नाइलाजाने अधीक्षकांना बढती देऊन प्रभारी साहाय्यक आयुक्त बनवावे लागते. त्यांच्याकडे ती क्षमता नसल्याने कामावर परिणाम होत असल्याचे पालिकेने मान्य केले आहे.

### नियुक्तीमागे अर्थकारणाचा आरोप

पालिकेच्या आकृतिबंधातील नियमानुसार सर्व प्रभागांत सेवाज्येष्ठता यादी अनुषंगाने अधिकाऱ्यांची नियुक्ती करणे क्रमप्राप्त होते. ही नियुक्ती करताना संबंधित अधिकाऱ्यांची शैक्षणिक पात्रता, अनुभव व ज्येष्ठता लक्षात घेतली जात नाही. ही नियुक्ती करण्यामागे आर्थिक हेतू असतो, असा आरोप सामाजिक कार्यकर्ते चरण भट यांनी केला आहे. प्रभारी अधिकाऱ्यांच्या माध्यमातून केवळ वसुली केली जाते. त्यामुळे सातत्याने प्रभारी साहाय्यक आयुक्तांची पदावनती, बदली आणि निलंबित करण्यात आले आहे. दुसरीकडे, या अधिकाऱ्यांवर कोणतीही जबाबदारी निश्चित नसल्याने पालिकेत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार वाढीस लागलेला आहे. अधिकारी-कर्मचारी नियुक्ती व बदलीचे लेखापरीक्षण करणे गरजेचे असताना आजपर्यंत ते झालेले नाही.

लोकमत पा. नं. ८

# वय उलटले तरी यापुढे पोलीस भरतीत संधी...

**लोकमत न्यूज नेटवर्क**

**मुंबई :** राज्य सरकारने पोलीस भरतीतील वयोमर्यादेबाबत मोठा निर्णय घेतला आहे. राज्य सरकारने पोलीस भरतीच्या कमाल वयोमर्यादेत वाढ केली आहे. यामुळे पोलीस भरतीसाठी इच्छुक असलेल्या तरुण-तरुणींना दिलासा मिळाला आहे.

कोरोनाच्या काळात, १ जानेवारी २०२० ते ३१ डिसेंबर २०२२ या कालावधीत ज्या उमेदवारांची वयाची कमाल मर्यादा पूर्ण झाली, अशा सर्व प्रवर्गातील उमेदवारांना या निर्णयामुळे एक संधी मिळणार आहे. २०२० आणि २१ या वर्षातील रिक्त पदे भरण्यासाठीच्या भरती प्रक्रियेसाठी एकवेळची उपाययोजना म्हणून हे उमेदवार पात्र असतील. शुक्रवारी गृहविभागाने याबाबतचे आदेश जारी केले आहे.

लोकसत्ता पा. नं. १३


# वसई, विरार परिसरात लम्पीमुळे तीन गुरांचा मृत्यू

**विरार :** वसई, विरार शहर आणि ग्रामीण भागांत लम्पी रोगाने आतापर्यंत ५४ गुरे बाधित झाली असून तीन गुरांचा मृत्यू झाला आहे.

मागील महिन्यात वसई, विरार परिसरात लम्पी संसर्गाचा शिरकाव झाल्यामुळे पशुपालकांच्या चिंता वाढल्या आहेत. आतापर्यंत वेगवेगळ्या भागातील ५४ जनावरे बाधित झाली असून त्यात राजावली, किरवली, सत्पाळा परिसरात अधिक बाधित गुरे आढळून आली आहेत. यात दोन वासरे आणि एका गाईचा मृत्यू झाला असल्याची माहिती वसई तालुका पशू संवर्धन अधिकारी नकुल कोरडे यांनी सांगितले. वसई, विरार परिसरात एकूण १८ गोशाळा आहेत. त्यांच्या तपासणीत ही वासरे बाधित असल्याचे आढळून आले. वसई पशुवैद्यकीय विभागाकडून दिलेल्या माहितीनुसार वसईत आठ हजारांहून अधिक गाई आहेत. आतापर्यंत १० हजार २०० जनावरांचे लसीकरण करण्यात आल्याचे कोरडे यांनी सांगितले. अद्यापही पशुसंवर्धन विभागातील अधिकारी, कर्मचारी यांना शासनातर्फे कोणतेही वाहन देण्यात आले नसल्याने पशुवैद्यक आणि कर्मचारी यांना स्वतःच्या खर्चाने फिरून लसीकरण करावे लागत आहे. यामुळे कर्मचाऱ्यांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे.

Scanned with OKEN Scanner

सकाळ पा. नं. ४



**मुंबई :** राज्य सरकारच्या जे.जे. रुग्णालय परिसरात सुमारे १३० वर्षे जुने ब्रिटिशकालीन भुयार सापडले.

# जे.जे.तील भुयाराबाबत चर्चांना उधाण

## रुग्णालय प्रशासन पुरातत्त्व विभागाकडून मार्गदर्शन घेणार

मुंबई, ता. ४ : राज्य सरकारच्या जे. जे. रुग्णालयात ब्रिटिशकालीन भुयार सापडल्याचा दावा केला जात असून यासंदर्भात अनेक प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहेत. या भुयाराचे बांधकाम १३० वर्षे जुने ब्रिटिशकालीन असल्याचे सांगितले जात असून आतील बांधकाम पूर्णतः विटांनी केल्याचे दिसते. त्यामुळे विटांनी केलेले बांधकाम हे जुने नसल्याचेही म्हटले जाते. दरम्यान, येथे वास्तव्यास असलेल्या मंडळींना भुयारी मार्गाबाबत माहिती असल्याने ही बाब जुनीच असल्याचे सांगितले जाते. दरम्यान, या भुयाराबाबत पुरातत्त्व विभागाकडून मार्गदर्शन घेणार असल्याचेही रुग्णालयाच्या अधिष्ठाता डॉ. पल्लवी सापळे यांनी सांगितले.

प्रसूतिगृह आणि महिला वॉर्डला जोडणारे येथे एक भुयार असल्याची आम्हाला आधीच कल्पना होती. ज्याबाबत आम्ही ऐकले होते, ते हेच भुयार असावे. आता जिल्हाधिकारी आणि पुरातत्त्व विभागाची परवानगी घेऊन भुयाराचा दुसरा मार्ग कुठे जातो, हे शोधण्याचा प्रयत्न केला जाईल. आतमध्ये विटांचे बांधकाम का आहे, याची माहिती अद्याप मिळालेली नाही.

**- डॉ. पल्लवी सापळे,** अधिष्ठाता, जे. जे. समूह रुग्णालय

जे. जे. रुग्णालयाचे निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. अरुण राठोड आणि त्यांचे सहकारी नियमितपणे रुग्णालय परिसरात पाहणी करताना नर्सिंग कॉलेजच्या परिसरात काहीतरी असल्याचा संशय आला. त्यांनी तेथील साहित्य बाजूला केले. अंधारात नेमके काय आहे, याबाबत कुतूहल वाढल्याने डॉ. राठोड यांनी मोबाईलच्या बॅटरीने आतमध्ये पाहणी केली असता त्यांना भुयार असल्याचे दिसले. हे भुयार तीन भागांत दिसत असल्याचे डॉ. राठोड म्हणाले.

### विटांचे बांधकाम कसे?

मुळात जे. जे. रुग्णालयाची इमारत दगडी स्वरूपाची आहे; मात्र भुयाराचे बांधकाम विटांनी केल्याचे दिसते. त्यामुळे भुयाराचे काम मध्यंतरीच्या काळात केले असावे, अशीही शक्यता व्यक्त केली जात आहे.

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र टाइम्स पु. पा. १


# आयुक्तालयाच्या हद्दीत हत्येच्या गुन्ह्यांमध्ये घट

**वैष्णवी राऊत, वसई**

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीतील हत्येच्या गुन्ह्यांमध्ये मागील वर्षाच्या तुलनेत यंदा घट झाल्याचे पोलिस आयुक्तालयाकडून मिळालेल्या माहितीमध्ये नुकतेच समोर आले आहे. मागील वर्षात पहिल्या नऊ महिन्यांत हत्येचे ४१ गुन्हे घडले होते. चालू वर्षात जानेवारी ते सप्टेंबर या नऊ महिन्यांत हत्येचे २९ गुन्हे घडले आहेत. मागील वर्षाच्या तुलनेत यंदा त्यात १२ने घट झाल्याची माहिती पोलिस आयुक्तालयाने दिली आहे.

वसई-विरार आणि मिरा-भाईंदर परिसरातील वाढती गुन्हेगारी पाहता, पोलिस आयुक्तालय उभारण्याची मागणी समोर आली होती. त्यामुळे दोन वर्षांपूर्वी मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालयाची स्थापना करण्यात आली. त्यानंतर पहिल्याच दोन वर्षांत गुन्हे उघडकीस आणण्याचे प्रमाण वाढल्याचे पोलिसांनी दिलेल्या आकडेवारीवरून समोर आले होते. गुन्हे उघडकीस आणण्याचे प्रमाण ७५ टक्क्यांच्या घरात होते. त्यानंतर, आता हत्येच्या गुन्ह्यांमध्ये घट झाल्याचे समोर आले आहे. मागील वर्षात जानेवारी ते सप्टेंबर दरम्यान हत्येचे ४१ गुन्हे आयुक्तालयाच्या हद्दीतील विविध पोलिस ठाण्यांत दाखल झाले होते, तर २०२२मध्ये जानेवारी ते सप्टेंबर दरम्यान २९ गुन्हे दाखल झाले आहेत. त्यामुळे गतवर्षाच्या तुलनेत हा आकडा १२ने घटला आहे. यामध्ये सर्वाधिक सात गुन्हे हे वालिव पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडले आहेत. त्या खालोखाल चार गुन्हे नालासोपारा पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडले.

**नऊ महिन्यांत २९ हत्या**



**हत्येच्या घटना (२०२२)**

| पोलिस ठाणे | गुन्ह्यांची संख्या |
|---|---|
| काशिमीरा | ३ |
| भाईंदर | १ |
| नवघर | ३ |
| वसई | १ |
| माणिकपूर | १ |
| तुळींज | १ |
| वालिव | ७ |
| आचोळे | २ |
| विरार | ३ |
| नालासोपारा | ४ |
| अर्नाळा | ३ |
| एकूण | २९ |

### सर्व गुन्हे उघडकीस आणण्यात यश

चालू वर्षात घडलेल्या सर्व २९ हत्यांच्या गुन्ह्यांची उकल करण्यात पोलिसांना यश आल्याची माहिती आयुक्तालयातून देण्यात आली. मागील वर्षी भुईगाव किनाऱ्यावर शीर नसलेल्या एका महिलेचा मृतदेह सापडला होता. या प्रकरणी गुन्ह्याची उकल करण्यात वसई पोलिसांना तब्बल दहा महिन्यांनंतर यश आले होते. तर नालासोपारा येथील एका महिलेच्या हत्येचा गुन्हा तात्काळ उघडकीस आणण्यात नालासोपारा पोलिसांना यश आले होते.

महाराष्ट्र टाइम्स पु. पा. १

# वसईतून हरवली... दिघीमध्ये सापडली

**वसई :** वसईतील पाचुबंदर येथून हरवलेली बोट शोधण्यात स्थानिकांसह वसई पोलिसांना यश आले आहे. शुक्रवारी सकाळी रायगड येथे ही बोट मिळाली आहे. बोटीवरील खलाशानेच ही बोट चोरून नेल्याची प्राथमिक माहिती समोर येत असून पोलिसांनी या खलाशाला ताब्यात घेतले आहे.

पाचुबंदर किनाऱ्यावर नांगरलेली 'सावपेद्दु' नावाची मच्छिमार बोट मंगळवारी हरवल्याचे समोर आले होते. बोटीवरील खलाशीही गायब झाल्याने ही बोट चोरीला गेल्याचा संशय बोटमालकाने व्यक्त केला होता. बुधवारी वसई पोलिस ठाण्यात तक्रार दिल्यानंतर, गुरुवारी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला. बोटीबाबत पोलिसांनी माहिती प्रसारित केली होती. त्यामुळे, रायगड, दिघी सागरी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एका व्यक्तीने मच्छिमार नेते फिलिप मस्तान यांच्याशी संपर्क साधून, बोट दिघी ठाण्याच्या हद्दीत असल्याचे सांगितले. पोलिसांनी तिथे जाऊन बोटीसह खलाशाला ताब्यात घेतले. चोरीचे कारण चौकशीत उघड होतील, असे वसई पोलिस ठाण्याचे पोनि कल्याण करपे यांनी सांगितले.

**चोरीस गेलेली बोट शोधण्यात यश**

Scanned with OKEN Scanner

पुढारी पा. न. ४

# वसईत मसाले उत्पादक कंपनीत धाड

## भेसळयुक्त ५७ लाखांचा साठा जप्त; अन्न आणि औषध प्रशासनाची कारवाई

**ठाणे : पुढारी वृत्तसेवा**

पालघर जिल्ह्यातील मसाले पदार्थांच्या उत्पादक कंपनीवर धाड टाकून अन्न आणि औषध प्रशासनाच्या वतीने सुमारे ५३ लाख ७७ हजार ३२२ रूपये किंमतीचे मसाले व मसाल्याच्या पदार्थांशी संबंधित माल जप्त केला आहे.



अन्न प्रशासनाला मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे गुरूवारी पालघर जिल्ह्यातील वसई पूर्व भागातील नायगाव येथे मेसर्स जे. जे. सिझनिंगअँड स्पाइसेस या उत्पादक कंपनीवर धाड टाकली त्यावेळी या कंपनीतून भेसळयुक्त हळदै पावडर ( ३,४०२ किलो), धनिया पावडर ( ५१९ किलो), बेसलू पावडर ( ६२८ किलो), जलजीरा पावडर( १,२५८ किलो), गरम मसाला (१,०६९ किलो), चिकन मसाला ( ६०६ किलो), किचन किंग मसाला ८३८ किलो),अप मसाला ( ६७८ किलो), लोणचे मसाला ( १.८७३ किलो), चिवडा मसाला ( २,७९८ किलो), चटपटा मसाला ( १२३ किलो), लाल मिरची पावडर ( ७९६ किलो), व्हाईट चायनीज मसाला ३९८ किलो), शेजवान मसाला ( ९६ किलो) तसेच मालवणी मिक्स मसाला ( १३ किलो) असा सुमारे ५३ लाख ७७ हजार ३२२ रूपये किमतीचा अन्नपदार्थांचा साठा जप्त करण्यात आल्याची माहिती अन्न प्रशासनाचे कोकण विभागाचे सह आयुक्त सुरेश देशमुख यांनी दैनिक पुढारीशी बोलतांना दिली.

कच्च्या मालाचे ते वापरापूर्वी अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरण, नवी दिल्ली यांनी मान्यता दिलेल्या एन ए बी एल प्रयोगशाळेकडून तपासणी किंवा विश्लेषण करूनच घेत नसल्याचेही लक्षात आले. संबंधित अन्न आस्थापना उत्पादक या वर्गवारीत व्यवसाय करीत असल्याने कोणत्याही अन्नपदार्थाची खरेदी किंवा विक्री परवानाधारक आणि किंवा नोंदणीधारक अन्न आस्थापनाकडून किंवा अन्न आस्थापनांना करणे व त्या अनुषंगाने अभिलेखा ठेवणे आवश्यक असताना पुरवठा किंवा विक्री केलेल्या अन्न आस्थापनांच्या परवाना किंवा नोंदणी याबाबत कोणताही अभिलेखा ठेवलेला नसल्याचे आढळून आल्याने तसेच सदर अन्न आस्थापनात अन्नपदार्थांची प्रत्यक्ष हाताळणी करणाऱ्या कामगारांचे ते त्वचारोग आणि किंवा संसर्गजन्य रोग यापासून मुक्त आहेत किंवा कसे याची खात्री व खातरजमा करण्यासाठी त्यांची प्राधिकृत वैद्यकीय व्यावसायिक यांच्याकडून वैद्यकीय तपासणी करणे आवश्यक आहे. संबंधित अन्न आस्थापनाकडून कोणत्याही कामगारांची त्या अनुषंगाने वैद्यकीय तपासणी करण्यात आलेली नसल्याने सदर अन्न आस्थापनास संबंधित त्रुटींची पूर्तता होईपर्यंत त्यांचा व्यवसाय बंद ठेवण्याचे स्पष्ट निर्देश घटनास्थळावर देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

अन्न विभागाचे सह आयुक्त सुरेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न सुरक्षा अधिकारी धनश्री ढाणे, प्रवीण सूर्यवंशी, दत्ता साळुंखे व योगेश ढाणे यांनी सहकार्य केले.

सामना पा. न. ८

## दुकान फोडले

**विरार :** नालासोपारा येथील जीवदानी इमारतीत राहणारे नहारसिंग खरवड यांचे शिवश्रद्धा ज्वेलर्स नावाचे दुकान आहे. या दुकानाला पाठीमागून भगदाड पाडून चोरट्यांनी आत प्रवेश केला. दुकानातील चांदीचे दागिने, रोख रक्कम आणि सीसीटीव्ही डीव्हीआर असा एकूण २ लाख ६५ हजारांचा मुद्देमाल चोरून नेला. दुसऱ्या दिवशी सकाळी खरवड यांनी दुकान उघडल्यानंतर त्यांना हा सर्व प्रकार लक्षात आला.

सामना पा. नं. ८

## मुलीचे अपहरण

**वसई :** एका वीस वर्षीय मुलीचे अपहरण करण्यात आल्याची घटना उघडकीस आली आहे. वाकण पाडा येथील ममावली गल्लीत राहणारी ही मुलगी सकाळी कामावर गेली होती. त्यानंतर ती परत आलीच नाही. तिच्या बहिणीने केलेल्या तक्रारीनुसार पेल्हार पोलीस ठाण्यात अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस आरोपीचा कसून शोध घेत आहे.

सामना पा. न. ८

## घरफोडी

नालासोपारा : मोरेगाव येथे राहणारे विजया शर्मा यांच्या घरातील मुद्देमाल घेऊन चोरट्यांनी पळ काढला. याप्रकरणी तुळींज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घराचा दरवाजा तोडून चोरट्यांनी आत प्रवेश केला. कपाटातील लॉकरमधील तब्बल १ लाख ५० हजारांचे दागिने लंपास केले.

Scanned with OKEN Scanner

पुण्य नगरी पु.पा. ४

# विनापरवानगी शूटिंग करणाऱ्यावर कारवाई

**मीरा रोड :** मीरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर पश्चिम रेल्वे समांतर ३० मीटर रस्त्यावर प्लॅनेट एरियामध्ये मे. वॉर्ड. एंटरटेन्मेंट या एजन्सीकडून महापालिकेची कोणतीही परवानगी न घेता शूटिंग करण्यात येत होती. यावर महापालिकेने कारवाई करत एजन्सीकडून २.९५ हजारांचा दंड वसूल केला.

मीरा-भाईंदर शहरात शूटिंग करायचे असेल तर महापालिकेची धोरणानुसार रितसर परवानगी घेणे गरजेचे असतानादेखील प्लॅनेट एरियामध्ये विनापरवानगी शूटिंग करत असल्याचे महानगरपालिकेला माहिती मिळाली. त्यानुसार महापालिकेच्या मिळकत विभागाने घटनास्थळी जाऊन सुरू असलेली शूटिंग बंद केली.त्यानंतर शूटिंगसाठी वापरण्यात येणारा कॅमेरादेखील जप्त करण्यात आला होता. त्यानंतर मिळकत विभागाने एजन्सीला नोटीस देत महानगरपालिकेच्या धोरणानुसार शूटिंग परवानगी व १० पटीने दंड असा एकूण २ लाख ९५ हजार दंड वसूल करण्यात आला आहे. शहरात कोणत्याही चित्रपट, मालिकेचे शूटिंग करायचे असेल तर महापालिकेची रितसर परवानगी घेऊनच शूटिंग करावे अन्यथा त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल, असे महापालिकेकडून सांगण्यात आले आहे.

पुढारी पु.पा. १

## संक्षिप्त


### वसई विकास सहकारी बँकेची रविवारी निवडणूक

**विरार :** शिंदे सरकारच्या आगमनानंतर सहकारी संस्थांच्या सुरु असलेल्या निवडणुकांना स्थगिती देण्यात आली होती. त्यामुळे वसईतील वसई सहकारी बँकेची होत असलेली निवडणूक स्थगितीमुळे पुढे ढकलली होती. ती आता ६ नोव्हेंबर रोजी होत असून वसईतील तीन गट, आगाशी व विरार गटातील अशा एकूण दहा उमेदवारांच्या व एक उमेदवाराची राहिलेली एकूणत्र ११ संचालक सदस्यांची निवड रविवारी होणार आहे. वसई विकास बँकेची मुदत होऊनही नव्याने निवडणूक मार्गी लागण्याऐवजी दोन वर्षे रखडली. त्यात निवडणूक जाहीर झाल्यावर तिला स्थगिती मिळाली. मागील २४ जुलै रोजी ही निवडणूक होणार होती. यामध्ये सत्तारुढ पॅनलचे सहा उमेदवार बिनविरोध निवडूनही आले होते. उर्वरित ११ जागांसाठी २८ उमेदवार रिंगणात होते. आठवड्यावर मतदान करण्याची तारीख असतानाच पाऊस आणि नैसर्गिक आपत्तीचे कारण देत राज्य शासनाने सर्वच निवडणुका पुढे ढकलल्या होत्या. अखेर मध्येच थांबलेली ही निवडणूक आता सहा नोव्हेंबरला होत आहे; तर ७ नोव्हेंबरला मतमोजणी होणार आहे.

सामना पा.न.१

# माझ्या कार्यकर्त्यांना अडवतोस... गोळ्या घालेन!

## शिंदे गटाचे आमदार संतोष बांगर यांची मंत्रालयात पोलिसांना धमकी



**मुंबई, दि. ४ (प्रतिनिधी) -** सत्ताधारी शिंदे-फडणवीस सरकारचे आमदार संतोष बांगर यांनी मंत्रालयाच्या गेटवर पोलिसांना शिवीगाळ केल्याचा निंदनीय प्रकार गुरुवारी दुपारी घडला. आपल्या कार्यकर्त्यांसह मंत्रालयाच्या गार्डन गेटमधून कोणतीही नोंद न करता प्रवेश करणाऱ्या बांगर यांना पोलिसांनी अडवले. त्यामुळे संतप्त झालेल्या बांगर यांनी ड्युटीवरील पोलिसाला शिवीगाळ करत गोळी घालेन अशी धमकी दिल्याचे सांगितले जाते. पोलिसांनी या घटनेची नोंद करून गृहमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पोलीस महासंचालक यांना त्याची माहिती दिली आहे.

हिंगोलीच्या कळमनुरीचे आमदार असलेले संतोष बांगर यांच्या दादागिरीचे किस्से ▮ पान ८

**बांगर मुख्यमंत्र्यांचेही ऐकत नाहीत- दानवे**

संतोष बांगर आणि वाद हे समीकरण आता सर्वांनाच माहिती झालेले आहे. मुख्यमंत्र्यांनी त्यांना अनेकदा समज दिली. तरीसुद्धा ते ऐकत नाहीत, अशी प्रतिक्रिया विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी दिली.

**बांगर यांची सारवासारव**

आमदार बांगर यांनी आपण पोलिसांना शिवीगाळ केलेली नाही आणि धमकीही दिलेली नाही असा दावा केला आहे. मंत्रालयाच्या गेटवरील पोलिसांसोबत मी हुज्जत घातलेली नाही. आमदारांसोबत कार्यकर्ते असतातच आणि त्यांनाही पोलीस आत सोडतात, त्यामुळे वाद होण्याचा प्रश्नच नाही. सीसीटीव्ही चेक करून शहानिशा करू शकता, अशी सारवासारव त्यांनी केली आहे.

Scanned with OKEN Scanner

लोकसत्ता पा.न.१२

# अखेर अनधिकृत नेटवर्क 'बूस्टर'वर कारवाई

## अतिक्रमण विभागाला आयुक्तांचे आदेश

**लोकसत्ता वार्ताहर**

**भाईंदर :** मीरा-भाईंदर शहरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यावर अनधिकृतपणे नेटवर्क बूस्टर उभारण्यात आले असल्याचे प्रकरण नुकतेच उजेडात आले होते. त्यामुळे आता अशा सर्व नेटवर्क बूस्टरवर कारवाई करण्याचे आदेश पालिका आयुक्तांनी अतिक्रमण विभागाला दिले आहे.

मीरा-भाईंदर शहरात रस्त्यावरील खांब्यांवर सीसीटीव्ही कॅमेरे उभारण्यात आले आहेत. त्यातील ४४ खांब्यांवर नेटवर्क बूस्टर उभारण्यात आले असल्याची बाब पालिकेच्या निदर्शनास आली होती. यात पालिका अधिकाऱ्यांनी अधिक माहिती घेतली असता हे सर्व नेटवर्क बूस्टर अनधिकृतपणे लावले असल्याचे स्पष्ट झाले होते. ज्या कंपनीने हे बूस्टर लावले आहेत, त्यांनीच काही ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेऱ्याची उभारणी केली आहे. हे नेटवर्क बूस्टर प्रामुख्याने मोबाइल कंपनीच्या प्रसारित होत असलेल्या नेटवर्कला अधिक प्रभावशाली करण्यासाठी वापरले जातात. यापूर्वीदेखील शहरात ७१७ मोबाइल मनोरे उभारण्यात आले आहेत. अशा मनोऱ्यांची थकबाकी अजून वसूल झालेली नाही. त्यामुळे आता नेटवर्क बूस्टरचेदेखील शहरात जाळे पसरून पालिकेचे नुकसान होऊ नये म्हणून पालिकेने कारवाईची तयारी केली आहे.

त्यानुसार पालिका आयुक्त दिलीप ढोले यांनी पालिकेच्या अतिक्रमण विभागाला अशा बूस्टरवर तसेच सीसीटीव्ही कॅमेऱ्यावर कारवाई करण्याचे आदेश शुक्रवारी दिले आहेत. त्यानंतर शहरातील बूस्टर लावण्यासाठी अधिकृत परवानगी द्यावी की, देऊ नये याविषयी अभ्यास केला जाणार असल्याची माहिती पालिका उपायुक्त संजय शिंदे यांनी दिली.

पुण्य नगरी पु.पा.१

# केवळ दुचाकी वाहनांवरच कारवाई का?

## भाजप उपाध्यक्ष मनोज बारोट यांचा वाहतूक विभागाला सवाल

**वसई :** वसई विरारमध्ये फक्त दुचाकी वाहनांवर कारवाई का? असा सवाल वाहतूक विभागाला करत सरसकट वाहतूक कोंडी करणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांवर कारवाई करावी, अशी मागणी भाजपचे उपाध्यक्ष मनोज बारोट यांनी केली आहे.



वसई विरार महापालिका क्षेत्रात ३० लाख लोकसंख्येसाठी परिवहन विभागाकडे केवळ ६५ बसेस सेवेसाठी आहेत. आरटीओ आणि परिवहन विभागाच्या उदासीनतेमुळे रिक्षाचालक प्रवाशांकडून मनमानी भाडे आकारत आहेत. त्यामुळे नागरिकांना आपल्या वैयक्तिक कामासाठी आपले खासगी वाहन घेऊन घराबाहेर पडावे लागते. मात्र महापालिकेच्या उदासीन धोरणामुळे पार्किंगची व्यवस्था नसल्यामुळे वाहनचालकांना जागा मिळेल तेथे ते आपले वाहन उभे करतात. या पार्क केलेल्या वाहनांपैकी वाहतूक विभाग केवळ दुचाकी वाहनांवर कारवाई करून ७०० रुपये दंड वसूल करत आहे, अशा तक्रारी दररोज प्राप्त होत आहे. त्यामुळे भाजपचे वसई विरार जिल्हा उपाध्यक्ष मनोज बारोट यांनी वाहतूक विभागाच्या या कारवाईवर प्रश्न उपस्थित केला असून, ही बाब वसई परिमंडळ २ व विरार परिमंडळ ३ च्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकांच्या निदर्शनास आणून दिली आहे.

महापालिकेची कमकुवत वाहतूक सेवा, रिक्षाचालकांची मनमानी, पार्किंग, नो पार्किंग झोन, नागरिकांच्या सोयीसाठी कोट्यवधी रुपये खर्चून बांधण्यात आलेल्या पेल्हार फाटा ते निर्मळ या मुख्य रस्त्यावरील बेकायदा गॅरेज आणि अवैध फेरीवाल्यांचे अतिक्रमण, मुख्य रस्त्याच्या दोन्ही बाजूला वर्षानुवर्षे बेकायदेशीरपणे उभी केलेली वाहने. नालासोपारा पूर्व आणि पश्चिमेला जोडणाऱ्या उड्डाणपुलाखाली दोन्ही बाजूला रिक्षा उभ्या केल्या जात आहेत. या परिसरात अनेक बेकायदा रिक्षा स्टँड असल्याने रिक्षाचालक रस्त्याच्या मधोमध रिक्षा उभी करतात. असंख्य अवैध पाण्याचे टँकर तसेच अनेक कालबाह्य वाहने या परिसरात धावत आहेत. या कारणांमुळे परिसरातील नागरिकांना वाहतुकीच्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. या सर्व बाबींकडे दुर्लक्ष करून केवळ दुचाकी वाहनांवर कारवाई करून ७०० रुपये दंड वसूल केला जात आहे. त्यामुळे या कारवाईबाबत बारोट यांनी वाहतूक विभागावर आरोप केला आहे की, ही कारवाई नागरिकांना वाहतुकीच्या समस्येपासून मुक्त करण्यासाठी केली जात नसून, टोईंग एजन्सी चालवणाऱ्या ठेकेदाराचे दुकान चालवण्यासाठी केली जात आहे. त्यामुळे दुचाकी वाहन चालकांना दंडीत करून ठेकेदाराचे दुकान चालवणारी कारवाई तत्काळ थांबवावी व नागरिकांना होणाऱ्या वाहतूक समस्येपासून मुक्ती मिळण्यासाठी सर्वप्रथम मनपा प्रशासनाकडून पार्किंगची व्यवस्था करावी व नो पार्किंग झोन घोषित करण्यात यावे. सर्व रस्त्यांवरील अवैध अतिक्रमणे हटवून त्यांच्यावर कारवाई करावी. त्याचप्रमाणे बेकायदेशीरपणे धावणाऱ्या अवैध वाहनांवर कारवाई करा. यानंतर कोणत्याही नागरिकाने नो पार्किंग झोनमध्ये वाहन उभे केल्यास त्याच्यावर कारवाई करा, अशी मागणी बारोट यांनी केली आहे. अन्यथा नागरिकांवर होत असलेल्या अन्यायाविरोधात भाजपाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा बारोट यांनी दिला आहे.

Scanned with OKEN Scanner

लोकसत्ता पा. नं. १२

# तक्रारीनंतर आठवडा उलटला तरी बोगस डॉक्टरवर कारवाई नाही

## चुकीच्या उपचाराने श्वानाचा मृत्यू झाल्याचा आरोप

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**विरार :** नालासोपारा आचोळे पोलीस ठाण्यात एका पशुवैद्यकाने श्वानावर चुकीच्या पद्धतीने उपचार केल्याने त्याला अपंगत्व येऊन त्याचा मृत्यू झाला होता. याप्रकरणी तक्रार दाखल करण्यात येऊन आठवडा उलटला, मात्र अद्याप या प्रकरणी कोणतीही कारवाई झालेली नाही.

नालासोपारा वसंत नगरी परिसरात राहणाऱ्या प्राणिमित्र लखन वालिया यांनी त्यांच्या सोसायटीतील अडीच महिन्याच्या श्वानाच्या पिल्लाच्या पायाला दुखापत झाल्याने पशुवैद्यक तथाकथित डॉक्टर कुलदीप मुकणे याच्याकडे उपचारासाठी ठेवले होते. कुलदीप मुकणे याने केलेल्या उपचाराने या श्वानाच्या पिल्लाला अपंगत्व आल्याने त्याला घरी आणले, मात्र दोन दिवसांत त्याचा मृत्यू झाला. यामुळे वालीया यांनी या डॉक्टरच्या विरोधात आचोळे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती.

सदर घटनेला आठवडा उलटला तरी पोलिसांनी या संदर्भात कोणतीही कारवाई केली नाही. पोलिसांनी कागदपत्रे तपासणीसाठी डॉक्टरला बोलावल्याचे सांगितले होते. मात्र त्यानंतर काहीही केले नसल्याचे वालीया यांनी सांगितले आहे. याबाबत आचोळे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक चंद्रकांत सरोदे यांनी माहिती दिली की, पोलीस तपास करत आहेत. महाराष्ट्र राज्य पशु वैद्यक परिषद नागपूर यांच्याकडून अहवाल मागविले आहेत. अहवाल आल्यावर पुढील कारवाई केली जाईल, असे त्यांनी सांगितले.

लोकसत्ता पा.नं. १२

# वसई पूर्वेकडून महामार्गावर जाणाऱ्या रस्त्यावर कोंडी

## एकदिशा मार्ग करण्याची मागणी

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** वसई पूर्वेकडून महामार्गावर जाणाऱ्या रस्त्यांवर मोठी वाहतूक कोंडी होत असते. ही वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी गोखिवरे रेंज कार्यालयापासून एकदिशा मार्ग (वन वे) करण्यात यावा, अशी मागणी करण्यात येत आहे.



वसई पूर्वेला औद्योगिक वसाहती आहेत. तेथून अवजड वाहनांची ये-जा सुरू असते. वसईतून मुंबईला जाण्यासाठी याच मार्गातून जावे लागते. मात्र सातिवली, गोखिवरे, वालीव या मार्गावर भयानक वाहतूक कोंडी होत असते. संध्याकाळच्या वेळी तर ही समस्या अधिक तीव्र होते. संध्याकाळी महामार्गापासून वसई स्थानकात येण्यासाठी एक ते दीड तासांचा वेळ लागत आहे.

पूर्वेकडून महामार्गावर जाण्यासाठी गोखिवरे रेंज कार्यालय नाक्यापासून सातिवली आणि वालीव असे मार्ग आहेत. संध्याकाळी आणि सकाळच्या वेळी तिथे मोठी वाहतूक कोंडी होते. कारण वाहनचालक उजव्या आणि डाव्या अशा दोन्ही बाजूने वाहने नेत असतात. त्यामुळे ही वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी गोखिवरे रेंज कार्यालय येथील मार्ग एकदिशा करण्यात यावा अशी मागणी शिवसेनेचे तालुका प्रमुख नीलेश तेंडोलकर यांनी केली आहे. एकदिशा मार्ग ही संकल्पना वसईत नाही. पण किमान या प्रचंड वाहतूक कोंडी असणाऱ्या ठिकाणी एकदिशा पद्धत सुरू करणे गरजेचे आहे. यामध्ये औद्योगिक वसाहती आणि इतर ठिकाणी जाणाऱ्या वाहनांना वळसा घालून जावे लागेल. त्यामुळे वाहतूक कोंडी कमी होईल आणि वेळ वाचेल असे त्यांनी सांगितले. या ठिकाणी वाहतूक कोंडीची समस्या दूर करण्याआठी वाहतूक पोलिसांची बैठकदेखील आयोजित करण्यात आली होती. मात्र त्यानंतर पुढे काहीच झाले नाही, असे त्यांनी सांगितले.

Scanned with OKEN Scanner